# <u>जाहीर नोटीस</u>

## <u>प्रमुख जिल्हा न्यायालय, रत्नागिरी या न्यायालयात</u>

या जाहीर नोटीशीद्वारे असे कळविण्यात येते की, .....

दिवाणी न्यायालय, देवरुख या न्यायालयातील कॅनन व क्योसेरा या प्रिंटरमधील टोनरचे वेळोवेळी रिफीलींग व त्यांची दुरुस्ती करुन घेणेकरिता सन २०२६—२०२७ या आर्थिक वर्षासाठी दर करार करणेकरीता सदर जाहिर नोटीसीद्वारे दरपत्रके मागविणेत येत आहेत. सदरचे दरपत्रक पुढील नमुद तपशीलामध्ये सादर करावीत.

**<u>कॅनन/क्योसेरा प्रिंटरमधील टोनर रिफीलींग व दुरुस्ती चार्जेसः—</u>**

| अ. क्र. | तपशील | दर |
|---|---|---|
| १ | टोनर रिफीलींग चार्जेस | |
| २ | डॉक्टर ब्लेड | |
| ३ | वायफर ब्लेड | |
| ४ | पी.सी.आर. | |
| ५ | मॅग्नेटीक रोलर | |
| ६ | ड्रम | |
| ७ | चिप | |

तरी ज्या कोणाला वर नमूद केलेप्रमाणे सन २०२६—२०२७ मध्ये या न्यायालयातील कॅनन व क्योसेरा या प्रिंटरमधील टोनरचे वेळोवेळी रिफीलींग व त्यांची दुरुस्ती करुन देणे शक्य असेल त्यांनी दरपत्रके (निविदा) खालील अटी व शर्तीस अधिन राहून ही नोटीस दिवाणी न्यायालय, देवरुख चे नोटीस बोर्डावर प्रसिध्द केलेपासून आठ दिवसांचे आत म्हणजेच दिनांक १५/०४/२०२६ पर्यंत सहाय्यक अधीक्षक (वित्त), दिवाणी न्यायालय, देवरुख येथे समक्ष आणून द्यावीत.

**<u>दरपत्रकांबाबत अटी व शर्ती</u>**

१. दरपत्रक आवश्यक त्या संपूर्ण तपशीलासह तारखेसहीत मा. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, देवरुख यांचे नावे असावे. त्यामध्ये कर, वस्तूची किंमत इत्यादीबाबी स्वतंत्र नमूद कराव्यात. तसेच दरपत्रकामध्ये किंवा लेटरहेडवर SGST/CGST क्रमांक नमूद करावा व पॅनकार्डची झेरॉक्स प्रत दरपत्रकासोबत सादर करावी.

२. सदर लखोटयावर टोनर रिफीलींग करणेबाबतचे दरपत्रक असे नमुद असावे.

म.आ.क्र.३४९६

(1)

३. जाहीर नोटीस मधील दिलेल्या तारखेनंतर आलेली दरपत्रके विचारात घेतले जाणार नाहीत.

४. सर्वात कमीत कमी दराचे दरपत्रक ज्यांचे असेल त्यांचे दरपत्रकाचा विचार करणेत येईल. दरपत्रकामध्ये खाडाखोड करणेत येवू नये.

५. टोनर रिफीलींग करिता वापरणेत येणारी पावडर उच्च प्रतिची असणे आवश्यक आहे. सदरचे टोनर रिफीलींगचे काम चांगल्या प्रतिचे नसल्यास सदरचा टोनर पुन्हा विनाशुल्क रिफीलींग करुन देणे बंधनकारक राहील. तसेच टोनर रिफीलींग बाबत वारंवार तक्रारी निर्माण झाल्यास त्याची गांभिर्याने दखल घेणेत येईल व कोणतीही आगाऊ नोटीस न देता करारपत्र रद्द करणेत येईल.

६. अपवादात्मक परिस्थितीत दरपत्रक नाकारण्याचा अधिकार मा. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, देवरुख यांना राहिल.

आज दि. ०७/०४/२०२६ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

CIVIL JUDGE J. D., DEORUKH

दिवाणी न्यायाधीश क. स्तर, देवरुख

दिनांक —०७/०४/२०२६

दिवाणी न्यायाधीश क.स्तर,

दिवाणी न्यायाधीश (क. स्तर)

देवरुख

म.जा.क्र.आस्था/ ७९९ सन २०२६

दिवाणी न्यायालय क.स्तर, देवरुख

दिनांक: ०७/०४/२०२६

**प्रत प्रसिध्दीकरीता:—**

१. सहाय्यक अधिक्षक (वित्त), जिल्हा न्यायालय, रत्नागिरी यांजकडे, मा.जिल्हा न्यायालय, रत्नागिरी येथील नोटीस बोर्डवर प्रसिध्दी करीता..

२. सहाय्यक अधिक्षक (वित्त), दिवाणी न्यायालय क.स्तर, देवरुख यांजकडे नोटीस बोर्डवर प्रसिध्दी करीता..

३. जिल्हा संगणक प्रणाली प्रशासक, जिल्हा न्यायालय, रत्नागिरी यांजकडे न्यायालयाचे वेबसाईटवर प्रसिध्दी करीता..